पिंपरी चिंचवड महानगरपालिका कॉर्पोरेशन इंटिग्रेटेड हेल्थ ॲण्ड फॅमिली वेलफेअर सोसायटी
२ रा मजला, वैद्यकिय विभाग, मुख्य प्रशासकीय इमारत,पिंपरी चिंचवड महानगरपालिका, मुंबई-पुणे हायवे लगत,
पिंपरी- ४११ ०१८

---

जाहिरात क्र. १०९/२०१५
क्रमांक- वैद्य/४/कावि/१३६०/२०१५
दि. ३/ ०६ /२०१५

# Walk - In -Interview (थेट मुलाखत)

पिंपरी चिंचवड महानगरपालिका कॉर्पोरेशन इंटिग्रेटेड हेल्थ ॲण्ड फॅमिली वेलफेअर सोसायटी अंतर्गत राष्ट्रीय शहरी आरोग्य अभियान (NUHM) साठी खाली नमुद केलेल्या शैक्षणिक पात्रता व अनुभवधारक उमेदवारांकडून अर्ज मागविणेत येत आहेत.

| अ. क्र. | पदनाम | पद संख्या | एकत्रीत मानधन | शैक्षणिक पात्रता व अनुभव | वय | प्रवर्गानुसार आरक्षण | मुलाखतीचा दिनांक व वेळ |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | वैद्यकीय अधिकारी (पुर्ण वेळ) | ९ | ४०,०००/- | एम.बी.बी.एस. महाराष्ट्र मेडिकल कैन्सील नोंदणी, अनुभव असल्यास प्राधान्य | ४५ वर्षे ( सेवा निवृत्त शासकिय अधिकारी असल्यस वयोमर्यादा कमाल ६५ वर्षापर्यंत राहील.) | अनुसुचित जाती- १<br>अनुसुचित जमाती-१<br>वि.जा.अ.-१<br>इ.मा.व.-२<br>खुला- ४ | दि.१५/६/२०१५ सकाळी १० ते सायं.५ पर्यंत. |
| २ | डेटा एन्ट्री ऑपरेटर तथा लेखापाल (PMU करीता) | १ | १०,०००/- | बी.कॉम/एम.कॉम पदवीधर, अद्ययावत टॅली व संगणकाचे ज्ञान, शासनमान्य मराठी व इंग्रजी टंकलेखन आवश्यक, २ वर्षे लेखा विषयक कामकाजाचा अनुभव आवश्यक | ३८ वर्षे | खुला – १ | दि.१७/६/२०१५ सकाळी १० ते सायं.५ पर्यंत. |
| ३ | ए.एन.एम | ५० | ८,६४०/- | १० वी उत्तीर्ण, एन.एन.एम.कोर्स उत्तीर्ण, एमएनसी नोंदणी आवश्यक तसेच अनुभव असल्यास प्राधान्य | ३८ वर्षे | अनुसुचित जाती- १०<br>अनुसुचित जमाती-५<br>वि.जा.अ.-१<br>भ.ज.ब.-१<br>भ.ज.क.-१<br>भ.ज.ड.-१<br>इ.मा.व.-१४<br>वि.मा.प्र.-१<br>खुला- १६ | दि.१८/६/२०१५ व १९/६/२०१५ सकाळी १० ते सायं.५ पर्यंत. |
| ४ | स्टाफ नर्स | ३८ | १०,८००/- | १२ वी उत्तीर्ण, जी.एन.एम. कोर्स उत्तीर्ण, एमएनसी नोंदणी आवश्यक तसेच अनुभव असल्यास प्राधान्य | ३८ वर्षे | अनुसुचित जाती- ५<br>अनुसुचित जमाती-३<br>वि.जा.अ.-१<br>भ.ज.ब.-१<br>भ.ज.क.-१<br>भ.ज.ड.-१<br>इ.मा.व.-७<br>वि.मा.प्र.-१<br>खुला- १८ | दि.२१/६/२०१५ व दि.२२/६/२०१५ सकाळी १० ते सायं.५ पर्यंत. |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ५ | लॅब टेक्नीशियन | १९ | ८,०००/- | बी.एस.सी. पदवी, डी.एम.एल.टी.कोर्स उत्तीर्ण, अनुभव असल्यास प्राधान्य | ३८ वर्षे | अनुसुचित जाती- ३<br>अनुसुचित जमाती-१<br>वि.जा.अ.-१<br>भ.ज.क.-१<br>इ.मा.व.-४<br>खुला- ९ | दि.२४/६/२०१५ सकाळी १० ते सायं.५ पर्यंत. |
| ६ | फार्मासिस्ट | १९ | ८,०००/- | डी.फार्म<br>अनुभव असल्यास प्राधान्य | ३८ वर्षे | अनुसुचित जाती- ३<br>अनुसुचित जमाती-१<br>वि.जा.अ.-१<br>भ.ज.क.-१<br>इ.मा.व.-४<br>खुला- ९ | दि.२५/६/२०१५ सकाळी १० ते सायं.५ पर्यंत. |
| ७ | डेटा एन्ट्री ऑपरेटर तथा लेखापाल (युपीएचसी) | १२ | १०,०००/- | बी.कॉम पदवीधर, अद्ययावत टॅली व संगणकाचे ज्ञान, शासनमान्य मराठी व इंग्रजी टंकलेखन आवश्यक, २ वर्षे लेखा विषयक कामकाजाचा अनुभव आवश्यक | ३८ वर्षे | अनुसुचित जाती- २<br>अनुसुचित जमाती-१<br>भ.ज.क.-१<br>इ.मा.व.-२<br>खुला- ६ | दि.२६/६/२०१५ सकाळी १० ते सायं.५ पर्यंत. |
| ८ | अटेंडन्ट (मदतनीस) | १३ | ६,०००/- | ७ वी पास | ३८ वर्षे | अनुसुचित जाती- २<br>अनुसुचित जमाती-१<br>वि.जा.अ.-१<br>भ.ज.क.-१<br>इ.मा.व.-२<br>खुला- ६ | दि.२९/६/२०१५ सकाळी १० ते सायं.५ पर्यंत. |

**<u>अटी व शर्ती-</u>**

१. राष्ट्रीय शहीरी आरोग्य अभियानांतर्गत भरण्यात येणा-या सर्व उमेदवारांची निवड थेट मुलाखतीने करण्यात येईल.

२. सदरची पदे राष्ट्रीय शहीरी आरोग्य अभियानांतर्गत राहतील, सदर पदांचा पिंपरी चिंचवड म.न.पा. अस्थापनेशी कसल्याही प्रकारचा संबंध राहणार नाही.

३. सदर पदे निव्वळ कंत्राटी पध्दतीने केवळ ०६ महिने कालावधी पुरती भरावयाची असुन प्रकल्प बंद होताच सदरील पदे आपोआप संपुष्टात येतील.

४. सदरची नियुक्ती पुर्णपणे तात्पुरत्या (हंगामी) स्वरुपाच्या आहेत. त्यामुळे अर्जदारास कायमपदी नियुक्तीचा हक्क सांगता येणार नाही ज्या दिवशी सोसायटीस सदर पदांची आवश्यकता नसेल त्यावेळी कोणत्याही नोटीशीशिवाय मानधनावरील सेवा समाप्त केली जाईल.

५. सदर पदांचे संख्येमध्ये अथवा आरक्षणामध्ये बदल होऊ शकतो.

६. सदरची भरती रद्द करणे अथवा स्थगीत करणे तसेच निवड/नियुक्ती प्रक्रिया कोणत्याही टप्प्यावर कोणतेही कारण न देता बदल अथवा रद्द करण्याचे अधिकार मा.आयुक्त, पिंपरी चिंचवड महानगरपालिका यांनी राखुन ठेवलेले आहेत.

७. मुलाखत एकास पाच (१:५) या प्रमाणे उमेदवारांना मुलाखतीस बोलवण्यात येईल. याकरिता उपरोक्त नमुद करणेत आलेल्या मुलाखतीच्या वेळापत्रकामधील दिनांकास पहिल्या १ तासामध्ये म्हणजे सकाळी १० ते ११ या वेळेत जेवढे उमेदवार उपस्थित असतील अशा उमेदवारांची हजेरी नोंदवून व त्यांचेकडून विहित नमुन्यातील अर्ज व कागदपत्रे घेण्यात येतील. त्यानंतर उपस्थित असलेल्या उमेदवारांची मुलाखतीसाठी नोंदणी करणेत येणार नाही व याबाबतचा अंतिम निर्णय मा.सदस्य सचिव तथा वैद्यकिय संचालक यांचा राहील.

८. जास्त उमेदवार आल्यास छाननीअंती एका पदास पाच उमेदवार या प्रमाणे पदानुसार पदवी/पदवीका/स्टाफनर्स/ए.एन.एम.कोर्स/फार्मासिस्ट/डेटा एन्ट्री ऑपरेटर कम लेखापाल (पीएमयु युनिट)/ डेटा एन्ट्री ऑपरेटर कम लेखापाल(युपीएचसी)/अटेंडन्ट/प्रयोगशाळा तंत्रज्ञ इ. शैक्षणीक पात्रतेच्या अंतिम वर्षाच्या परीक्षेतील गुणवत्तेनुसार मुलाखतीसाठी गुणांचा कट ऑफ लावण्यात येईल.

९. मुलाखत एकुण १०० गुणांची परीक्षा राहील.

१०. या मध्ये पदवी/पदवीका/स्टाफनर्स/ए.एन.एम.कोर्स/फार्मासिस्ट/डेटा एन्ट्री ऑपरेटर कम लेखापाल (पीएमयु युनिट)/ डेटा एन्ट्री ऑपरेटर कम लेखापाल(युपीएचसी)/अटेंडन्ट/प्रयोगशाळा तंत्रज्ञ या शेवटच्या वर्षाच्या गुणानुसार जास्तीत जास्त ८० गुण देण्यात येतील.

अ) शेवटच्या वर्षाचे गुण ग्राहय धरले जातील.

ब) २० गुण अतिरिक्त शिक्षण, अनुभव व विषय ज्ञानावर आधारीत राहतील.

११. अनुभवाच्या बाबतीत फक्त शासकिय, निमशासकिय, स्थानिक स्वराज्य संस्था यांचा अथवा राष्ट्रीय शहरी आरोग्य अभियान अंतर्गत असणारा अनुभव ग्राहय धरण्यात येईल.

१२. मुलाखतीस पात्र असलेल्या उमेदवारांनी खालील कागदपत्रांसह स्वखर्चाने मुलाखतीस उपस्थित रहावे. त्यांना कोणत्याही प्रकारचा प्रवास भत्ता देय नाही.

**कागदपत्रे-**

१. इच्छुक व पात्र उमेदवारांनी थेट मुलाखतीला येताना म.न.पा.वेबसाईट www.pcmcindia.gov.in वर दिलेल्या नमुन्यातील अर्ज, शैक्षणीक अर्हता प्रमाणपत्रे व खालील कागदपत्रे यांच्या छायांकित सत्यप्रती जोडाव्यात अर्जासोबत मुळ प्रमाणत्रे जोडू नयेत.

२. पासपोर्ट साईज फोटो २. जन्मतारखेचा पुरावा (जन्माचा दाखला/शाळा सोडल्याचा दाखला) ३. रहिवाशी दाखला ४. ओळख प्रमाणत्र ५. पदानुसार शैक्षणीक अर्हता प्रमाणत्र ६.जातीचा दाखला ७.अनुभव प्रमाणपत्र

१३. **मुलाखतीचे ठिकाण-** पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचे यशवंतराव चव्हाण स्मृती रुग्णालय, १ ला मजला चाणक्य हॉल.

**सही/-**
**आयुक्त**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी- ४११ ०१८

## उमेदवाराने करावयाच्या अर्जाचा नमुना

| |
|---|
| या ठिकाणी<br>पासपोर्ट साईज<br>फोटो<br>चिटकवावा. |

**प्रति,**

**मा.सदस्य सचिव,**
कॉर्पोरेशन इंटिग्रेटेड हेल्थ ऍण्ड फॅमिली
वेलफेअर सोसायटी पी.सी.एम.सी.
२ रा मजला, वैद्यकिय विभाग, मुख्य प्रशासकीय इमारत,
पिंपरी चिंचवड महानगरपालिका, मुंबई-पुणे हायवे लगत, पिंपरी- ४११ ०१८

**विषय- ---------------------------------------- या पदासाठी अर्ज**

**महोदय,**

संदर्भीय जाहीरातीनुसार मी -------------------------------------- पद -------------------------- हया तात्पुरत्या स्वरुपातील हंगामी पदासाठी आवश्यक अर्हता धारण करीत असून निवड होण्याकरीता विहीत नमुन्यातील अर्ज सादर करीत आहे.

माझी तपशीलवार माहिती खालील प्रमाणे-

१) संपूर्ण नांव- ------------------------------------------------------------------------

२) पत्रव्यवहाराचा संपर्ण पत्ता-------------------------------------------------------------

--------------------------------------------------------------------------------

३) मोबईल क्रमांक ------------------------------------------------------------------

४) ई-मेल आयडी----------------------------------------------------------------------

५) धर्म- --------------------- ६) जात---------------------- ७) प्रवर्ग- ------------------

७) जन्मतारीख------------------------------ ८) लिंग – पुरुष / स्त्री

९) अर्जदाराने धारण केलेल्या शैक्षणिक अर्हतेचा तपशील-

| अ.क्र. | शैक्षणिक अर्हता | उत्तीर्ण वर्ष | मिळालेले गुण | टक्केवारी |
|---|---|---|---|---|
| | | | | |
| | | | | |
| | | | | |
| | | | | |
| | | | | |

१०) तांत्रिक व इतर अर्हता तपशील- --------------------------------------------------------
--------------------------------------------------------------------------------

११) अनुभव तपशील-

| अ.क्र. | संस्थेचे नांव | संस्थेचा पत्ता दुरध्वनीसह | पद | कालावधी |
|---|---|---|---|---|
| | | | | |
| | | | | |

वर नमुद केलेला तपशील खरा व बराबर असून त्याबाबत आवश्यक प्रमाणपत्रांच्या प्रमाणित प्रती सोबत जोडत आहे. मी असेही प्रमाणित करतो/करते की, वर दिलेली माहिती खोटी अगर चुकिची आढळून आल्यास या माहितीच्या आधारे मिळालेली तात्पुरत्या स्वरुपातील हंगामी नोकरीवरुन कमी करण्यास मी पात्र राहीन, तसेच माझ्याविरुध्द कायदेशीर कारवाई प्रस्तावीत होईल, याची मला जाणीव आहे.

स्थळ- अर्जदारची सही-

दिनांक- / /२०१५ (नांव- )

सहपत्रे- अर्जासोबत खालील प्रमाणपत्रांच्या प्रमाणित सत्यप्रती जोडणे आवश्यक आहे.

१) शैक्षणिक व इतर अर्हतेची प्रमाणत्र
२) जातीचा दाखला
३) अनुभवाचे प्रमाणपत्र